साप्ताहिक

# पोलीस तपास

पोलीस आणि जनतेचे व्यासपीठ

भारत सरकार मान्यताप्राप्त
Posted at Patrica Channel STG.Office, GPO, Kurla PO Mumbai-400070
Published on every Thursday & Friday of week
Posting Date: MNE/380/2016-18

संपादक - राजु गणपत जाधव    कार्यकारी संपादक-साजिद बुखारी    उपसंपादक - तुषार राणे

( संपूर्ण महाराष्ट्र राज्य , गुजरात, कर्नाटक, गोवा राज्यात वितरीत होणारे एकमेव साप्ताहिक )

RNI : MAHMAR / 2013 / 51541 | वर्ष : १२ , अंक : ४२ , मुंबई, १९ जून २०२५ ते २५ जून २०२५ पाने : ४, मुल्य : २ रुपये | website :- www.policetapas.com

### नेहरूनगर पोलीस ठाणे, टिळकनगर पोलीस ठाणे व ट्रॉम्बे पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाची कौतुकास्पद कामगिरी

## आंतरराष्ट्रीय ‘उडता पंजाब गँग’ च्या पोलीसांनी आवळल्या मुसक्या



**नेहरूनगर पोलीस ठाणे, हद्दीतील अभ्युदय बँक मधील एटीएम मशिनचे लॅचं लॉक बनावट चावीने उघडुन आतील रोख रक्कम चोरी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय आरोपींना ‘भटिंडा’ पंजाब येथुन पोलीसांनी ताब्यात घेतल्या बाबत.**




**मुंबई (राजू ग. जाधव):** कुर्ला, नेहरूनगर पोलीसांनी एटीएम मशीन मधुन रोकड रक्कम चोरणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीच्या पोलीसांनी मुसक्या आवळल्या आहेत.सदर उडता पंजाब गँगचे चार कुख्यात सदस्य यांना अटक केले आहेत. हे आरोपी पंजाबच्या भटिंडा जिल्ह्यातुन अटक करण्यात आले असून देशभरातील विविध एटीएम फोडींच्या घटनांमध्ये हे कुख्यात सदस्य वॉंटेन्ड होते. हे मनमौजी करीता नशेच्या गर्तेत अडकलेल्या या आरोपींनी फक्त नशेकरीता आणि जिवाच्या ऐशोआरामासाठी ही धाडसी गुन्हेगारी केली होती.अशी माहिती पोलीस सूत्रांकडून मिळाली होती.

**( उर्वरित वृत्त पान २ वर )**

### नागपाडा पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाची कौतुकास्पद कामगिरी

## १२ तासांच्या आत १००% मुद्देमाल केला हस्तगत



**नागपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३०००/- ग्रॅम सोने असलेली बॅग जबरदस्तीने हिसकावुन नेणाऱ्या चोरट्यांना पोलीस दलातील विविध पथकांनी १२ तासांच्या आत १००% मुद्देमाल केला हस्तगत,**

**मुंबई ( साजिद बुखारी):** मुंबई शहरातील नागपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गुरुवार दिनांक १२६०६६२०२५ रोजी सकाळी ०८.४०, वाजण्याच्या सुमारास फिर्यादी व त्यांचा पुतण्या हे त्यांच्या होंडा अॅक्टीव्हा दुचाकीवरून लोअर परेल येथील ऑफिसमध्ये जात असताना ०४ अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना जबरदस्त मारहाण व धक्काबुक्की करुन त्यांच्या हातातील राखाडी रंगाच्या बॅगेत असलेले १५००, ग्रॅम वजनाचे सोन्याचे बिस्किटे व १५००, ग्रॅम वजनाचे तुटलेले रिपेरींग दागिने असे अंदाजे एकुण ३०००/– ग्रॅम सोने असलेली बॅग जबरदस्तीने हिसकावुन घेवून पळून गेले म्हणून फिर्यादीने नागपाडा पोलीस ठाणे येथे गुरक्र ३६४६२०२५,कलम ३०९,(६).३.(५) भा न्या सं, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा आवाहानात्मक असल्याने घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन तात्काळ मा, पोलीस उप आयुक्त ( प्रगटीकरण.) व मा, पोलीस उप आयुक्त ( परिमंडळ –३.) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे व गुन्हे शाखा अंतर्गत विविध पोलीस पथके तयार करण्यात आली.सदर पोलीस पथकाने अथक परिश्रम घेवुन एकुण ५ आरोपींना अटक करण्यात यश प्राप्त केले आहे.व त्यांच्याकडून गुन्ह्यातील चोरीला गेलेले ३०००६–ग्रॅम सोने असे १००: मालमत्ता किंमत अंदाजे २,५५,००,०००६– ( दोन कोटी पंच्चावन लाख रुपये) हस्तगत करण्यात आले आहे.अशा प्रकारे मुंबई सारख्या गजबजलेल्या शहरात दिवसाढवळ्या केलेली जबरी चोरी मुंबई पोलीस दलातील विविध पोलीस पथकाने अत्यंत वेगाने तपास करुन चोरीला गेलेला संपूर्ण १००: मुद्दे माल १२ तासांच्या आत हस्तगत करण्यात यश प्राप्त करून मुंबई पोलीस दलाने नाव लौकीक केले आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा पोलीस आयुक्त ( बृहन्मुंबई.) श्री.देवेन भारती.मा.पोलीस सह आयुक्त ( गुन्हे.) श्री.लखमी गौतम,मा पोलीस सह आयुक्त ( का व सु.) मा.श्री सत्यनारायण चौधरी, मा, अप्पर पोलीस आयुक्त,(गुन्हे.) श्री.शैलेश बलकवडे.मा.अप्पर पोलीस आयुक्त.( मध्य प्रादेशिक विभाग.) मा, श्री, विक्रम देशमाने.मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण.) श्री. राज तिलक रौशन.मा.पोलीस उप आयुक्त ( परिमंडळ –३.) श्री, कृष्णकांत उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई पोलीस दलातील विविध पोलीस पथकाने केली आहे.

## यलोगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मोटारसायकल चोरी करणाऱ्या चोरट्याला ठोकल्या बेड्या



**मुंबई ( तुषार राणे):** एलोगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत फिर्यादी अशोक कुमार सलमान कनोजिया वय ५५, रा ठि रुम न,२०७४,साल्टपॅन रोड एस.पी.रोड. संगमनगर.श्रीराम चाळ कमिटी वडाळा पुर्व पश्चिम मुंबई.येथे वास्तव्य करीत असुन ते कामा करीता एलोगेट बीपीटी येथे रविवार दिनांक ०८/०६/२०२५ रोजी १७,३० वाजण्याच्या दरम्यान येथे पार्क करून कामासाठी गेले होते. परंतु वरील नमुद तारीख वेळी व त्या ठिकाणी अज्ञात इसमाने फिर्यादी यांच्या मालकीची असलेली मोटारसायकल एक्टीवा क्रमांक,एम एच,०१, डी,एन,९९२१ बीपीटी यलोगेट इथे पार्क केली असताना एका अनोळखी यांचा वर नमूद वर्णनाची गाडी मालक – फिर्यादी संमती शिवाय लबाडीच्या इराद्याने चोरी केली म्हणून फिर्यादी यांने दिनांक ०९/०६/२०२५ रोजी स,१२.००. वाजता यलोगेट पोलीस ठाणे येथे गुरक्र १०/२०२५, बीएनएस,२०२३,कलम ३०३. (२) गुन्हा दाखल करण्यात आला . चोरीस गेलेल्या एक्टिवा वर्णन – मॉडेल –२०२१,एम,एच,०१,डि,एन,९९२१,अंकि रु,३०००/ – सदर गाडी आहे.

सदर गुन्ह्याचा तपास एपीआय.शेळके,व गुन्हे प्रकटीकरण पोलीस पथक नमुद गुन्ह्यातील संशोध नक्की आरोपी यांचा शोध घेण्यासाठी १५,विज कॅमेरे परिसरातील ते सगळे कॅमेरे तसेच एमआरएफ पोलीस ठाणे सरकारी कॅमेरे व प्रायव्हेट कॅमेरे यांचे सीसीटीव्ही फुटेज चेक करुन नमुद पाहिजे आरोपीचा शोध घेतला काही ही माहिती मिळत नसताना आज रोजी संबंधित गुन्हे प्रकटीकरण पोलीस पथकाने एच सी ०६– १८९७, ठाकुर पीसी १४०४०० नेटके, नमुद पुण्यातील पाहिजे आरोपीचा शोध घेत असता तसेच गुप्त बातमीदारमार्फत पी डी मेलो भवन,या ठिकाणी मोटर एक्टीवा व सदरचा संस्थेत आरोपी बाळाचा याला उभा करून ताब्यात घेण्यात आले आहे.व त्याला तात्काळ माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार त्याला उभा करीत आहोत.तसेच पुढील तपास चालू आहे.सदर अटक आरोपी ब्रिजेश प्यारेश्याम प्रजापती वय २२ धंदा – लेबर,रा ठि,रुम न,५५, समर्थ हॉटेल, वसल्याताई नगरगल्ली नंबर –०७ एस जी बर्वे मार्ग ठक्कर बाप्पा चेंबूर मुंबई यास ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर गुन्ह्याचा यशस्वी तपास प्रमुख मार्गदर्शन माननीय.पोर्ट झोन डीसीपी विजयकांत सागर, सहाय्यक पोलीस आयुक्त माया मोरे, मॅडम.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती प्रतिभा मुळे,यलोगेट पोलीस ठाणे मुंबई, यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी एपीआय, सचिन शेळके.एच,सी. ठाकुर,पीसीध नेटके,एचसी शिंदे, यांनी कामगिरी केली आहे,

### गुन्हे शाखा घटक –२ भिवंडी पोलीसांची दमदार कामगिरी

## पोलीसांनी १ आरोपीस अटक करुन त्याच्याकडुन ६ मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या असुन ४ गुन्ह्याची केली उकल

**मुंबई ( संजय शेकोकार):** नमुद घटनेबाबत सा. पोलीस तपास ह्या क्राईम वृतपत्रास पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार सदर गुन्ह्याबाबत नारपोली पोलीस ठाणे, भिवंडी येथे गुरक्र २०८/२०२५, भारतीय न्याय संहिता,२०२३,कलम,३०३.(२) या गुन्ह्याची गुन्हे शाखा घटक –२ , भिवंडीचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे समांतर तपास करीत असताना पोहवा/ साबीर शेख.यांना मिळालेल्या गोपनीय माहितींच्या आधारे संशयित आरोपी रजाउल नदीम अख्तर अन्सारी,वय,२४ वर्षे, रा, ठि, आझादनगर, इमरान पठाणची चाळ.मुंब्रा, जिल्हा.ठाणे,यांस संशयावरून त्यास तात्काळ ताब्यात




घेवुन त्याच्याकडे अत्यंत गोपनीय बारकाईने कौशल्यपूर्ण तपास करुन त्याच्याकडुन एकुण – १,७७,०००/– रुपये किंमतीच्या ०६ मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या असून खालील नमुद ०४ गुन्हे उघडकीस आणण्यात आले.

१) नारपोली,पो, ठाणे, गुन्हा रजि न,२०८,/२०२५,भा न्या सं, कलम ३०३.(२) प्रमाणे.

२) निजामपुरा पो ठाणे, गुन्हा रजि न,५८९/२०२५,भा न्या सं,कलम ३०३.(२) प्रमाणे.

३) खडकपाडा पो ठाणे.कल्याण गुन्हा र नोंद,३८७/२०२२,भादवि अंतर्गत कलम,३७९, प्रमाणे.

४) माटुंगा पोलीस ठाणे.मुंबई.गुन्हा रजि न,१५०/२०२२,भादवि,कलम,३७९, प्रमाणे.

सदरची यशस्वी कामगिरी ही मा, डॉ. पंजाबराव उगले, अप्पर पोलीस आयुक्त, गुन्हे, ठाणे.शहर.मा.अमरसिंह जाधव पोलीस उप आयुक्त गुन्हे ठाणे. शहर.व मा, श्री, शेखर बागडे सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे शोध –०१, ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा घटक –२ भिवंडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, जर्नादन सोनावणे.सपोनि./ श्री राज माळी.सपोनि./ धनराज केदार. पोहवा/ सुनील साळुंखे.पोहवा/ निलेश बोरसे.पोहवा / साबीर शेख.पोहवा/ रंगनाथ पाटील.पोहवा/ किशोर थोरात. पोहवा/ राजेश गावडे.पोहवा/ सुदेश घाग.पोशि/ अमोल इंगळे.मपोहवा/माया डोंगरे,व मपोना/ सायली गंभेरा.यांनी केली आहे.

## भटण बोगदा – मुंबई – पुणे एक्स्प्रेस हायवेवर भीषण अपघात

**मुंबई (देवेंद्र कुंभार): मुंबई –पुणे एक्स्प्रेस हायवेवरील आज रोजी बुधवार दिनांक १८/०६/२०२५ च्या सकाळी ७,३० वाजण्याच्या सुमारास भटण बोगद्यात ७ ते ८ वाहने अतिवेगाने येवुन एकमेकांना जोरदारपणे धडकल्याने मोठा अपघात झाला आहे,यात आरोपी असलेल्या ५ ते ६ पिंजरा गाड्या,१ महामंडळाची बस,१ टेम्पो.१ पोलीस स्कॉर्पीओ आणि जीपचा समावेश आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार १६ ते १८ पोलीस किरकोळ जखमी झाले आहेत.तर काही १० ते १२ बांगलादेशी कैदी देखील जखमी झाले असून त्यांना तातडीने दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे.

अपघातग्रस्त वाहान – मुंबई शहराच्या दोन,व नवीमुंबई पोलीस यांची एक पोलीस व्हॅन.बांगलादेशी आरोपीस लोहगाव विमानतळ पुणे येथे घेवुन जात असताना वाहतुकीच्या ओघामध्ये एका पाठोपाठ असणाऱ्या पोलीस व्हॅन एकमेकांवर आदळून हा भीषण अपघात घडला आहे.सर्व जखमी यांना MJM-HOSPITAL,Kalmboli,, नाका येथे







उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.एकुण– बांगलादेशी आरोपी –४० ( मुंबई शहर,) पोलीस स्टाफ – २, १८ अंमलदार,–LA,२. व २,PSI, १५ अंमलदार एल ए–०१,

घटनास्थळी अग्निशमन दल.अॅम्बुलन्स, ट्रॅफिक पोलीस यांची मदत तात्काळ मिळाली असून भटण बोगद्यातील वाहातुक सुरळीत करण्यात आली आहे.

सदर बाबतीत नमुद नियोजन व नियंत्रण अधिकारी पोलीस निरीक्षक श्री, चाळके, विशेष शाखा मुंबई मोबाईल क्र,०८८७९५३१९७४, यांनी केली आहे.

## महिलांच्या नावे बनावट आयडी बनवणारा शुभम सिंग पोलीसांच्या जाळयात

# एका २५ वर्षीय सुरक्षा रक्षकाने केली ३०० महिलांची फसवणूक



**मुंबई (आशा राजू जाधव):** इन्स्टाग्रामवर महिलांच्या नावाने बनावट आयडी तयार करून अश्लील मेसेज आणि फोटो प्रसारित करणाऱ्या एका सुरक्षा रक्षकाला मुंबई पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.सुरक्षा रक्षक शुभमकुमार मनोजप्रसाद सिंग, वय,२५,वर्षे,असे या आरोपीचे नाव असून तो आतापर्यंत ३०० हुन अधिक महिलांना ब्लॅकमेल करून त्यांची बदनामी करत होता.अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे.ही कारवाई दहिसर पोलीस ठाण्याच्या सायबर सेलच्या पोलीस पथकाने केली.सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. अंकुश दांडगे यांच्या नेतृत्वाखालील पोलीस पथकाने केलेल्या तांत्रिक तपासानंतर पोलीसांनी शुभम सिंगला कर्नाटकातुन अटक केली आहे. सद्या तो पोलीस कोठडीत आहे, व पोलीस तपास सुरू आहे.महिला विद्यार्थीनीच्या तक्रारीनंतर उघड झाला प्रकार एका महाविद्यालयीन तरुणीने दहिसर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तिच्या नावाने इन्स्टाग्रामवर अनेक बनावट आयडी तयार करण्यात आले होते.त्या खात्यावरुन तिच्याविषयी अश्लील स्टोरीज आणि मेसेज टाकले जात होते.तक्रारीच्या आधारे पोलिसांनी सोशल मीडियाच्या कंपन्यांकडून माहिती मागवुन आयपी अॅड्रेस ट्रॅक केला आणि आरोपीचा शोध घेण्यात आला.

मोबाईलमध्ये सापडली धक्कादायक माहिती शुभम सिंग यांच्या मोबाईलची झडती घेतली असता पोलिसांना १०० बनावट ईमेल आयडी ११ बनावट इन्स्टाग्राम खात्याचा वापर तसेच १३,५००/– पेक्षा अधिक महिलांचे फोटो आणि स्क्रीनशॉटस मिळाले.तपासात उघड झाले की आरोपीने दिल्लीतील रेहान आयटी सेंटर मधुन सॉफ्ट स्कील डिप्लोमा पूर्ण केला होता. आणि सोशल मीडियाचा गैरवापर करत होता.

# १४ वर्षीय बालकाची निर्घृण हत्या, नरबळीचा संशय फोल

### ३६ तासात छडा लागला, डोक्याला मुंग्या आणणारं कारण



**जळगाव (बापू शिवाजी कारंडे):** धारदार शस्त्राने गळयावर वार करून बालकाची निर्घृण हत्या करण्यात आली होती. जळगाव स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या ३६ तासांत या घटनेचा छडा लावला.जळगाव जिल्ह्यात एरंडोल तालुक्यातील रिंगणगाव येथे १४ वर्षीय बालकाची क्रूर हत्या करण्यात आली होती. जळगाव स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या ३६ तासांत या घटनेचा छडा लावून तिघांपैकी दोन संशयितांच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. मुलाला धक्का लागल्याच्या क्षुल्लक कारणावरुन वाद होऊन तिघा जणांनी बालकाला मारहाण करीत चाकूने त्याचा गळा चिरुन हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहेत. हरदास वास्कले व सुरेश खरते अशी अटक केलेल्यांची नावे असून तिसरा संशयित रिचडिया कटोले फरार आहे.रिंगणगाव (ता. एरंडोल) येथील अल्पवयीन बालकाला त्याच्या घरातून अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची तक्रार त्याचे वडील गजानन महाजन यांनी एरंडोल पोलीस ठाण्यात दिली होती.

मंगळवारी रिंगणगाव–खर्चे रोडवरील पडक्या शेतात एका काटेरी झुडपात त्याचा मृतदेह आढळला. धारदार शस्त्राने गळ्यावर वार करून त्याची निर्घृण हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाले होते. संतप्त गावकऱ्यांनी रास्ता रोको आणि महामार्गावर निदर्शने करत आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली होती. या गुन्ह्यात आरोपींनी कोणताही पुरावा मागे ठेवला नव्हता, तसेच त्यांना कुणीही पाहिले नव्हते. त्यामुळे आरोपींचा शोध घेणे पोलिसांसाठी मोठे आव्हान होते. पोलिसांनी या बालकाच्या हालचालींचा आणि तो कोणत्या व्यक्तींच्या संपर्कात आला याचा कसून तपास सुरू केला. मृतदेह आढळला तेथून ५० फूट अंतरावर राहणाऱ्या मध्य प्रदेशातील खर्गोन परिसरातील काही मजुरांवर पोलिसांना संशय आला. यातील हरदास वास्कले आणि सुरेश खरते हे अचानक त्यांच्या गावी निघून गेल्याने पोलिसांचा संशय बळावला. हरदास वास्कले याला फैजपूर–रावेर मार्गावर मोटारसायकलवर जात असताना मोठ्या शिताफीने ताब्यात घेण्यात आले.चौकशीअंती हरदास वास्कले याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानुसार शेजारी राहणाऱ्या सुरेश खरते आणि गावातील रिचडिया कटोले यांच्यासोबत फिरत असताना बालकाला सुरेश वास्कलेचा धक्का लागला. यावरून सुरेशने त्याला शिवीगाळ करत मारहाण केली होती. बालकाने विरोध केला असता तिघांनी त्याला मारहाण केली आणि रिचडिया कटोले याने त्याच्याकडील चाकूने त्याच्या गळ्यावर वार करून हत्या केली. त्यानंतर मृतदेह झुडपात लपवून ठेवला.स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुरेश खरते याचा मध्य प्रदेशातील धोपा, ता. झिरन्या, जि. खर्गोन येथून डोंगरवस्तीतून पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. या प्रकरणात तिसरा साथीदार रिचडिया कटोले याचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक रवाना झाले आहे.

# धक्कादायक घटना – कोल्हापुरात महाराष्ट्राला हादरवणारं हत्याकांड

### धार्मिक संस्थेत अल्पवयीन विद्यार्थ्याला इलेक्ट्रीकल शॉक देवुन संपवल, याघटनेचे चकीत करणारे कारण समोर



**कोल्हापूर (दिलावर महात):** महाराष्ट्र राज्यातील पुरोगामी विचारांचा वारसा जपणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. कोल्हापुरच्या हातकणंगले तालुक्यातील आळते येथे एका धार्मिक शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थेत एका अल्पवयीन विद्यार्थ्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे.या घटनेमुळे कोल्हापुरामध्ये एकच खळबळ उडाली आहे. जनलोकांमध्ये चर्चेतील विषय बनला आहे.

सदर अल्पवयीन विद्यार्थ्यांचे नाव फैजान नाजिमा, वय११ वर्षे मृत मुलाचे नाव आहे. या संस्थेतील एका अल्पवयीन मुलानेच फैजान नाजिमा याची हत्या केल्याचे समोर आले आहे.याचे मुळ कारण असे आहे की ही संस्था बंद पडुन आपल्याला घरी जायला मिळावे हे हत्येचे कारण समोर आले आहे. आळते येथे असणाऱ्या या शिक्षण संस्थेत अंदाजे ८० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यापैकी बहुतांश ७० विद्यार्थी हे बिहार या राज्यांतील आहेत.हत्या झालेल्या फैजान नाजिमा आणि हत्या करणारा हे दोघे ही बिहार राज्यातील आहेत.हत्या करणाऱ्या विद्यार्थ्याला आपल्या गावी बिहारला जावयाचे होते.त्याकरीता ही संस्था बंद पडावी त्या करीता त्याने मयत फैजान नाजिमा याची हत्या इलेक्ट्रिकचा शॉक देवुन केली




आहे, सुरूवातीला त्याचा मृत्यू झोपेतच झाल्याचे कारण सांगितले जात होते. मात्र पोलिसांना संशय आल्याने त्यांनी संस्थेतील विद्यार्थीवर्गाची चौकशी केली, त्यावेळी एका अल्पवयीन विद्यार्थ्याने आपणच फैजानला इलेक्ट्रिक वायरचा शॉक देवुन त्याची हत्या केल्याची कबुली दिली आहे.सदर कोल्हापूर जिल्ह्यातील ही पहिलीच घटना घडली आहे.याची पोलिसांनी तात्काळ चौकशी करून कारवाई करण्याकरीता यंत्रणा अलर्ट झाली आहे, याबाबत सदर संस्थेच्या संचालक कमिटीची ही चौकशी देखील करावी,

## आंबेगाव पोलीसांची कौशल्यपुर्ण कामगिरी

### जांभुळवाडी परिसरात एका तरुणाचा निघून खुन करुन पसार झालेल्या आरोपीला इंदौर, मध्यप्रदेश येथून ताब्यात घेवून २४ तासाच्या आत केले जेरबंद

**पुणे (कांता राठोड):** दिनांक १५/०६/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाचे सुमारास आंबेगांव पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अंमलदार हणमंत मासाळ, चेतन गोरे यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दिनांक १४/०६/२०२५ रोजी रात्रौ २२.३० वाजताचे सुमारास जांभुळवाडी तलावाचे बांधावर, आंबेगांव खुर्द पुणे येथे एका तरुणाचा निर्जुन खुन केला आहे. सदर माहितीची खात्री करणेकरीता आंबेगांव पोलीस स्टेशनचे वपोनि श्री शरद झिने, पोनि गुन्हे गजानन चोरमले, तपास पथकाचे प्रभारी मोहन कळमकर तसेच तपास पथकातील अंमलदार यांनी बातमीचे ठिकाणी जावून पाहणी केली त्या ठिकाणी एका तरूण मुलाचा खुन झाला असल्याचे दिसले. घडले प्रकाराबाबत इसम नामे दिपक सुरेश बंडगर, वय–२१ वर्षे, प्रतिक हाईट्स, पारे कंपनी रोड, नन्हे पुणे यांनी तक्रार दिल्याने आंबेगांव पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर १२४/२०२५, भारतीय न्याय संहीता कलम १०३, २३८ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

खुन करणाऱ्या आरोपीबाबत अधिक माहिती घेतली असता खून करणारा इसम सुरज गणेश सुर्यवंशी, वय–२२ वर्षे, हा इंदौर मध्यप्रदेश येथे गेला असल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच तात्काळ तपास पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक मोहन कळमकर व पोलीस अंमलदार चेतन गोरे, हणमंत मासाळ, धनाजी धोत्रे, सचिन गाडे असे इंदौर, मध्यप्रदेश येथे जावुन मिळालेल्या माहितीच्या आधारे तसेच तांत्रीक विश्लेषण करुन गुन्हयातील आरोपी याचा शोध घेतला असता तो इंदौर, मध्यप्रदेश येथे मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्यांचेकडे कसोशीने तपास करता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त, पुणे शहर मा. अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त मा. रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशीक विभाग पुणे मा. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ–२ पुणे श्रीमती स्मार्तना पाटील, सहा. पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग पुणे श्री. राहुल आवारे यांचे मार्गदर्शनाखाली आंबेगाव पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शरद झिने, पोनि गुन्हे गजानन चोरमले, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रियंका गोरे, पोलीस उपनिरीक्षक मोहन कळमकर, मारुती वाघमारे, पोलीस अंमलदार शैलेंद्र साठे, चेतन गोरे, हणमंत मासाळ, विनायक पाडळे, निलेश जमदाडे, सचिन तनपुरे, प्रमोद कांबळे धनाजी धोत्रे, सचिन गाडे, प्रमोद भोसले, नितीन कातुर्डे, योगेश जगदाळे, सुभाष गोरे, हरिश गायकवाड, अजय कामठे, यांच्या पथकाने केली.

## नाशिकमध्ये एम.डी. ड्रग्ज विक्री प्रकरणी दोघांना अटक

### गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई



**नाशिक (श्यामसुंदर अंबादास झळके):** एम.डी. ड्रग्ज विक्री प्रकरणी दोघांना अटक. गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई नाशिक (श्यामसुंदर अंबादास झळके): एम. डी. (मेफेड्रॉन) या प्रतिबंधित अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या दोन जणांना गुन्हे शाखा युनिट क्रमांक २ च्या पथकाने अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून एकूण ८.५ ग्रॅम वजनाची एम.डी. पावडर आणि इतर साहित्य मिळून २ लाख १२ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

संबंधित कारवाई पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, पोलिस उपआयुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव आणि सहायक पोलिस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. नाशिक शहरात अमली पदार्थांची निर्मिती, साठवणूक आणि विक्री यावर कडक कारवाई करण्याच्या सूचनांनुसार ही यशस्वी कारवाई झाली.

गुन्हे शाखा युनिट २ चे सहायक पोलिस उप निरीक्षक गुलाब सोनार यांना माहिती मिळाली, की दोन व्यक्ती रिक्षामधून एमडी ड्रग्ज विक्रीसाठी मानूर रस्त्यावर येणार आहेत. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून संशयितांना अडवले.

चौकशीत त्यांची नावे संशयितरू सुमीत अशोक धाईंजे (वय २७, रा. लोखंडे मळा, उपनगर) आणि शाकीर हसन सय्यद (वय ३२, रा. वडाळागाव) अशी असल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्याकडून ८.५ ग्रॅम एम.डी. पावडर (सुमारे ४२ हजार ५००), १.५० लाखांची रिक्षा, २० हजारांचे मोबाईल फोन असे मिळून दोन लाख १२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संशयितांविरुद्ध आडगाव पोलिस ठाण्यात अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील कारवाई सुरू आहे.

संबंधित कारवाई अमली पदार्थविरोधी पथकाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुशीला कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक हेमंत तोडकर, डॉ. समाधान हिरे, मुक्तारखान पठाण, गुलाब सोनार, अतुल पाटील, वाल्मीक चव्हाण, मनोज परदेशी यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांनी केली.

उर्वरित वृत्त पान १ वरुन

### नेहरूनगर पोलीस ठाणे, टिळकनगर पोलीस ठाणे व ट्रॉम्बे पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाची कौतुकास्पद कामगिरी

# आंतरराष्ट्रीय 'उडता पंजाब गॅंग' च्या पोलीसांनी आवळल्या मुसक्या

ही घटना शनिवार दिनांक ०७/०६/२०२५ रोजी सकाळी ०६.२३, वाजण्याच्या ते ६.३० वाजताच्या सुमारास मुंबईच्या कुर्ला पुर्व नेहरुनगर परिसरातील अभ्युदय को,ऑपरेटिव्ह बॅंकेच्या एटीएम मशीनचे लॉक तोंडुन त्यातील रोख रक्कम रु.३,०७,५००/– व १ एटीएम मशिनची कॅसेट लबाडीच्या इराद्याने अप्रामाणिकपणे चोरी करुन नेली.याबाबत फिर्यादी यांनी अज्ञात इसमाविरुद्धात नेहरु नगर पोलीस ठाणे येथे गुरक्र २५८/२०२५, कलम,३०५. (अ).३.(५).भा न्या सं, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.गुन्ह्याच्या तपासामध्ये आरोपींनी वापरलेल्या कार्यप्रणालीवरुन गुन्ह्यांच्या कलमांमध्ये कलम,१११,३१८(४)३३६(३),३४०(२) भा न्या सं,सह कलम,४३.(अ).६६.(क).व ६६.(ड). माहिती व तंत्रज्ञान अधिनियम या कलमांचा समावेश करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे गुन्हे कार्यप्रणाली वापरून एटीएम मधून रोख रक्कम रु.८.८६.६००/– चोरी केल्याबाबत घाटकोपर पोलीस ठाणे मुंबई येथे गुरक्र ५२५/२०२५,कलम ३०५.(अ) ३ (५) भा न्या संहिता अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासासाठी मा. समीर शेख, पोलीस उप आयुक्त परिमंडळ –०६, मुंबई यांनी तात्काळ वेगवेगळ्या पोलीस पथकांची नेमणूक केली.सदर पोलीस पथकाने सीसीटीव्ही,कॅमेरे व तांत्रिक कौशल्याचा योग्य प्रकारे गुप्त वापर करून गुन्ह्यातील सहभाग असलेला आरोपी १) जसबिर सिंग सुखदेव सिंग.वय.२९.वर्षे,रा ठि. लेहरा बेगा रोड. निरंकारी भवन जवळ.लंबी कॉलनी.बुंची मंडी,भटिंडा, पंजाब,२) लखवीर सिंग.बलदेव सिंग.वय.३१.वर्षे.रा.ठी.गाव,रायखाना. तालुका, सौरमंडी, जिल्हा,भटिंडा, राज्य, पंजाब,३) गुरुप्रीत सिंग,करनैल सिंग, वय,२७ वर्षे.रा.ठी.वर्माबस्ती जवळ.भटिंडा रेल्वे स्टेशनसमोर.बुचि मंडी, जिल्हा–भटिंडा, पंजाब,४) राजपाल सिंग बलदेव सिंग,वय,३७ वर्षे, रा ठि.काका हलवाई रोड,वार्ड क्र.१३, सौरमंडी, जिल्हा,भटिंडा, पंजाब यांना भटिंडा पंजाब येथुन ताब्यात घेवुन अटक केली आहे.

सदर अटक आरोपींकडून गुन्ह्यातील चोरी केलेल्या रक्कमेतुन खरेदी केलेली अंदाजे किंमत ३.००.०००/– जुवा स्कोडा.कंपनीची मोटार/कार क्र.एच.आर. ४०,डी,९६८१,रोख रक्कम रु,२०.०००/ – गुन्ह्यांमध्ये वापरलेले तीन मोबाईल.स्पाय कॅमेरा.एअरटेल माय वायफाय.इंटरनेट डोंगल.तीन सिमकार्ड.मेमरी कार्ड रिडर.ओ. टी.जी.व बनावट चावी.इ.मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच अटक आरोपींनी घाटकोपर पोलीस ठाणे येथील गुन्ह्याची देखील कबुली दिली आहे.सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी पावडे हे करीत आहेत.

सदर यशस्वी कामगिरी मा पोलीस आयुक्त बृहन्मुंबई श्री.देवेन भारती,मा पोलीस सह आयुक्त (का व सु,) श्री.सत्यनारायण चौधरी.मा.अप्पर पोलीस आयुक्त.पुर्व प्रादेशिक विभाग, मुंबई डॉ महेश पाटील.मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ –०६.मुर्ब्ई, समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त, (नेहरुनगर विभाग,) श्री. युसुफ सौदागन, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,नेहरुनगर पोलीस ठाणे. पोलीस निरीक्षक श्री.अंकुश खेडकर. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री, शिवाजी पावडे.गुन्हे प्रकटीकरण पोलीस पथकाचे सपोनि शैलेंद्र जगदाळे.पोउनि. विनायक फराकटे.तांत्रिक तपास अधिकारी पोउनि,अजय गोलार.ट्रॉम्बे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक श्री शरद नानेकर. टिळकनगर पोलीस ठाण्याचे पोउनि, विजयसिंह देशमुख.पोह.दशरथ राणे.पोह. श्रीहरी कसबे.पोह.संजय आव्हाड.पोशि.संदीप पाचपुते.पोशि.स्वप्नील वानखेडे.पोशि.विकास काटकर, पोशि, तुषार भागवत.पोशि.विशाल परदेशी.अजिंक्य ताजवे यांनी केली आहे.

# कुंडमळा पूल दुर्घटनेनंतर पुणे प्रशासन ॲक्शन मोडमध्ये

## जिल्ह्यातील सर्व धोकादायक पूल पाडण्याचा घेतला निर्णय

**पुणे ( गोविंद सदाशिक बोधेकर):** मावळ तालुक्यातील इंद्रायणी नदीवरील कुंडमळा येथे रविवारी घडलेल्या पूल दुर्घटनेने जिल्ह्याला हादरवून सोडले आहे. या दुर्घटनेत चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर ५१ पर्यटक नदीच्या प्रवाहात वाहून गेले होते, ज्यांना सुदैवाने वाचवण्यात यश आले. या गंभीर घटनेनंतर पुणे जिल्हा प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. एकंदरीत, इंद्रायणी नदीवरील दुर्घटनेने प्रशासनाला खडबडून जागे केले असून, जिल्ह्यातील सार्वजनिक संरचनेच्या सुरक्षिततेबाबत तातडीने उपाययोजना केल्या जात आहेत.

जिल्ह्यातील संभाव्य धोके टाळण्यासाठी, पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी आता एक मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील सर्व धोकादायक पूल पाडण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने जाहीर केला आहे.

मावळ येथील घटनेनंतर, पुणे महानगरपालिकेनेही शहरातील सुरक्षिततेचा मुद्दा गांभीर्याने घेतला आहे. पुण्यातील जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची प्रक्रिया पालिकेने यापूर्वीच सुरू केली होती, पण तज्ज्ञ सल्लागारांच्या नेमणुकीअभावी ती रखडली होती.

यापूर्वी ९८ मोठ्या पुलांचे ऑडिट पूर्ण केले असून, त्यापैकी ३८ पुलांच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. यातील ११ पुलांची दुरुस्ती झाली असून उर्वरित ६२ पूल आणि सुमारे ४३८ कल्व्हर्टचे ऑडिट अद्याप बाकी आहे. दरम्यान, दुर्घटनेनंतर आता या प्रक्रियेला गती देण्यासाठी पालिकेने स्ट्रक्चरल ऑडिटसाठी नव्याने निविदा काढली आहे.

# रोडवर वयोवृद्धाला लुटणाऱ्या तीन आरोपींना अवघ्या चार तासात मुद्देमालसह अटक



**लातूर (जितेंद्र ठाकूर):** किल्लारी पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये एका ८० वर्षीय वृद्ध इसमाला मारहाण करून त्याच्याकडील रोख रक्कम व हातातील सोन्याच्या दोन अंगठ्या चोरणाऱ्या अनोळखी गुन्हेगारांना अवघ्या चार तासात निष्पन्न करून गुन्ह्यातील सोन्याची अंगठी व गुन्ह्यांत वापरलेली मोटारसायकल असे ८०,०००/– रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे किल्लारीची कामगिरी.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, दिनांक १४/०६/२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता पोलीस ठाणे किल्लारी हद्दीतील लामजना शिवारातील रोड वरून जाणाऱ्या एका ८४ वर्षीय वृद्धाला 'तू आमच्या अंगावर का थुकलास'असे म्हणून मारहाण करून त्याच्या जवळील १५ हजार रुपये रोख रक्कम व हातातील अंगठ्या अज्ञात तीन आरोपींनी मारहाण करून जबरदस्तीने हिसकावून घेऊन पळून गेल्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे किल्लारी येथे अज्ञात आरोपी विरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे किल्लारीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. विशाल शहाणे यांनी तात्काळ अधिकारी, अमलदारांचे पथक तयार करून तपासाची चक्रे फिरवली. दरम्यान नमूद पोलीस तपास पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वयोवृद्धास मारहाण करून रोख रक्कम,सोन्याच्या अंगठ्या चोरलेल्या तीन आरोपींना निष्पन्न करून त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांना विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा कबूल करून रस्त्याने जाणाऱ्या वयोवृद्ध इसमाला मारहाण करून बळजबरीने, त्याच्याकडील रोख रक्कम व सोन्याच्या अंगठ्या हिसकावून घेऊन पळून गेल्याचे सांगितले. त्यांचेकडून सोन्याची अंगठी व गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असे एकूण ८०,०००/–रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

गुन्ह्यात अटक केलेल्या आरोपींची नावे वसीम रजाक शेख, (वय २१ वर्ष, राहणार शिंदगाव तालुका रेनापुर जिल्हा लातूर), इम्रान महताब शेख, (वय २४ वर्ष, राहणार शिंदगाव तालुका रेनापुर. जिल्हा लातूर),कौरव जनक लहाडे, (वय ४१ वर्ष, राहणार पाखरसांगवी, तालुका जिल्हा लातूर).असे असून नमूद गुन्ह्यात त्यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात किल्लारी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. विशाल शहाणे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक शिंदे, ढोणे, पोलीस अंमलदार गणेश यादव, दत्ता जाधव, बालाजी लटुरे, सोमवंशी, रवी करके, आबा इंगळे यांनी केली आहे. जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना अवघ्या चार तासात निष्पन्न करून ताब्यात घेतले आहे.

## प्रतिबंधित खैर लाकूड वाहतूक प्रकरणी ट्रकसह एक जण अटकेत, ४१ लाखांचा मुद्देमाल जप्त



**ठाणे (अविनाश आवळेगावकर) :** वागळे इस्टेट गुन्हे शाखा युनिट ५च्या पथकाने मिळालेल्या गुप्त माहितीनुसार खैराच्या प्रतिबंधित लाकडाची अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रकवर कारवाई करत ४१ लाख ७५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एका इसमाला अटक करण्यात आली आहे. दि. १७ जून २०२५ रोजी पहाटे १ वाजता नितीन नाका मार्गे माजिवाडाच्या दिशेने जाणाऱ्या ट्रक (क्र. जीजे १५ वायवाय ५६५२) वर वागळे गुन्हे शाखेने सापळा रचत कारवाई केली. या ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये १०.५ टन वजनाची, अंदाजे ३१,७२,५००/– रुपये किंमतीची प्रतिबंधित खैर लाकडाची ओंडके आढळून आली. ट्रकसह एकूण ४१,७५,५००/– रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.

याप्रकरणी ट्रकचालक अनिलकुमार रामचंद्र गुप्ता (वय ५४, रा. साईदर्शन कॉलनी, धुळे) यास अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४५२/२०२५ भारतीय दंड संहिता कलम ३०३(२), ३(५), तसेच भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत कलम ४१(ब), ४२, ५२(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोउपायुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली, सहा. पो. आयुक्त शेखर बागडे, वरिष्ठ पो. नि. सलील भोसले, सपोनि शरद पाटील व त्यांच्या पथकातील पोहवा पालांडे, निकम, तारी, पोना ठाणेकर, पोशि शिकारे व पो. ७५४ यादव यांनी संयुक्तपणे केली. पुढील तपास वागळे युनिटचे सहा. पो. नि. श्री. शरद युवराज पाटील करत आहेत.

## दागिने चोरणाऱ्या आरोपीस दोन तासात अटक,सपोनि अक्षय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

**म्हसवड (हितेश प्रकाश त्रिवेदी): मुलांचे ॲडमिशन करण्याच्या बहाण्याने शाळेत येऊन शिक्षिकेचे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या आरोपीस अवघ्या दोन तासात अटक करून जमिनीत पुरुन ठेवलेले सोन्याच्या दागिन्यांचा १ लाख १५ हजार रुपये किमतीचा शंभर टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपी मनोज सुरेश घमंडे (वय ४० वर्ष ) राहणार धामणी यास अटक केली आहे.**




शाळा सुरू झालेल्या पहिल्याच दिवशी जिल्हा परिषद शाळा पळशी येथील शिक्षिकेच्या पर्स मधून सोन्याचे दागिने चोरणाऱ्या अनोळखी आरोपीस अवघ्या २ तासात अटक करून चोरीस गेलेला सोन्याचा शंभर टक्के जमिनीत पुरून ठेवलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे यांना यश आले आहे.

'जिल्हा परिषद शाळा पळशी येथील शिक्षिका प्रतिभा शरद कुल यांनी म्हसवड पोलीस ठाण्यात त्यांचे सोन्याचे दागिने अज्ञात इसमाने चोरून घेऊन गेले बाबत चोरीचा गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ तपासाची चक्रे फिरवली असता शाळेतील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता त्यामध्ये एक अज्ञात इसम शिक्षकांच्या स्टाफ रूम मध्ये येऊन त्यांनी या शिक्षिकेच्या पर्सच्या आतमध्ये ठेवलेल्या पॉकेटची चौन उघडी करून त्यामधील सोन्याच्या रिंगा, सोन्याची साखळी, सोन्याची अंगठी चोरून घेऊन गेलेले दिसले. या अनुषंगाने तात्काळ सीसीटीव्ही फुटेज मधील दिसणाऱ्या व्यक्तीच्या शोधासाठी पथक तयार करून या व्यक्तीची माहिती घेतली असता तो व्यक्ती धामणी या गावातील मनोज सुरेश घमंडे वय ४० वर्ष हा असल्याची खात्रीलायक माहिती मिळाल्याने त्याला पकडण्याकरिता जाऊन त्याकरिता तांत्रिक बाबींचा देखील उपयोग करून सदर आरोपीस शीताफिने पाठलाग करून पकडल्यानंतर त्याला चोरलेल्या दागिन्यांबाबत विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर या आरोपीला पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर या आरोपीने चोरीच्या गुन्ह्याची कबुली देऊन चोरलेले सर्व दागिने हे धामणी गावातील मोकळ्या पटांगणामध्ये खड्डा करून पुरून ठेवले असे सांगितल्यानंतर हे सर्व दागिने त्याच्याकडून जप्त करण्यात आले असून अवघ्या दोन तासात या चोरीच्या घटनेचा उलगडा करण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे आणि स्टाफला यश आलेले असून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल या आरोपीकडून हस्तगत करण्यात आलेला आहे. या आरोपीकडे या चोरीच्या अनुषंगाने अधिक विचारपूस केली असता काल सर्वत्र चालू झालेल्या शाळेच्या अनुषंगाने हा व्यक्ती मुलांच्या घ्डमिशनच्या बहाण्याने या शाळेमध्ये आलेला होता. व त्याने पालक मेळावा चालल्याचे बघून संधी साधून शिक्षक स्टाफ रूम मध्ये जाऊन तिथे ठेवलेल्या पर्समधील सोन्याचे दागिने चोरलेले होते.

परंतु सदरची घटना सीसीटीव्हीत कैद झाल्यामुळे तात्काळ तपासाची चक्रे फिरवून अवघ्या २ तासात हा गुन्हा उघडकीस आल्यामुळे तक्रारदार यांचे चोरीस गेलेले दागिने त्यांना मिळाले असून आरोपीस अटक करून आज रोजी माननीय न्यायालयात हजर केलेले आहे. चोरीच्या गुन्ह्याचा उलगडा अवघ्या दोन तासात लावून सर्व सोन्याचे दागिने परत मिळाल्यामुळे सर्वत्र म्हसवड पोलिसांचे कौतुक होत आहे.

सदरची कामगिरी ही सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक श्री तुषार जोशी सर, अप्पर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर मॅडम, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल ठाकूर सर यांच्या मार्गदर्शनाखाली खालील पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांनी केलेली आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक अनिल वाघमोडे, देवानंद खाडे, राजेंद्र कुंभार,अमर नारनवर, नवनाथ शिरकुळे, अनिल वाघमोडे, सतीश जाधव यांनी या कारवाईत भाग घेतला.

## पुण्यातील महिला डॉन कल्याणी देशपांडेची डेंजर स्टोरी !

### २५ वर्ष IT कर्मचाऱ्यांना सेक्स वर्कर पुरवणारी महाराष्ट्रातील सर्वात मोठी महिला गुन्हेगार

**पुणे (मंगेश देवरुखकर):** पुण्यातील कुप्रसिद्ध कल्याणी देशपांडे ला पिंपरी–चिंचवडच्या अंमली विरोधी पथकाने आंध्रप्रदेशमधून बेड्या ठोकल्या आहेत. पिटासह मोका गुन्ह्यामध्ये शिक्षा भोगून आलेली कल्याणी गांजा विक्री रॅकेट ची मास्टरमाइंड आहे.

काही दिवसांपूर्वी अंमली पदार्थ विरोधी पथकाने कल्याणी देशपांडेच्या गांजा रॅकेट चा पर्दाफाश केला होता. तिच्या पतीसह जावयाला देखील पोलिसांनी बेड्या ठोकल्या होता. कल्याणी देशपांडे फरार होण्यात यशस्वी झाली होती. अखेर तीला जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले आहे. या अटकेमुळे कल्याणी देशपांडेची डेंजर स्टोरी पुन्हा एकदा चर्तेत आली आहे.

कल्याणी देशपांडेकडे पाहिले असता एक सुसंस्कृत, सुशिक्षित आणि उच्चभ्रू समाजातील बाई अशी तिची प्रतिमा वाटते. कल्याण रेकॉर्डमधली एक अट्टल गुन्हेगार आहे. तब्बल २२ वर्षाच्या गुन्हेगारी कारकीर्दीत तिच्यावर २१ प्रकारची सेक्स रॅकेट आणि काही खुनांच्या संदर्भात गुन्हे दाखल झाले. जयश्री उर्फ कल्याणी देशपांडे असं तिचं नाव. पुण्यातल्या बऱ्याचं आयटी कंपन्यांमध्ये ती हायप्रोफाईल रॅकेट चालवायची.

पुण्यातील एक उच्चभ्रू परिसरात कल्याणी देशपांडे तिच्या बंगल्यातून व्हीनस एस्कॉर्ट्स नावाची एस्कॉर्ट एजन्सी चालवत होती. पाषाण रोडजल तीचा हा बंगला होता. हा बंगला वेश्याव्यवसाय आणि गुन्हेगारीसाठी प्रसिद्ध होता. कल्याणीचा हा व्यवसाय बिनबोभाटा सुरु होता. डिसेंबर २००७ मध्ये याच बंगल्यात अनिल ढोले. नावाच्या व्यक्तीचा खून झाला. अनिल ढोले. हा कल्याणीचा जवळचा सहकारी. अनिल ढोले. याच्या हत्येमुळे कल्याणीचा वेश्याव्यवसाय उघडकीस आला.

अनिल ढोले. हा मुंबईहून वेश्याव्यवसायासाठी कॉल गर्ल्स आणण्यासाठी एजंट म्हणून काम करत होता असा आरोप केला जातो. ढोले याच्या हत्येनंतरही कल्याणीचा व्यवसाय सुरु होता. पुणे आणि इतर भागात वेश्याव्यवसायासाठी देश–विदेशातील मुलींचा पुरवठा करत होती. कल्याणीने एक मोठे नेटवर्क तयार केले. कल्याणी देशपांडेने हॉटेल व्यावसायिक आणि त्यांच्याशी संबंधित गुन्हेगारी सिंडिकेटमध्ये एक मजबूत नेटवर्क तयार केले. तिचे अनेक हाय–प्रोफाइल क्लायंट होते. याशिवाय, कल्याणीला गुन्ह्यांमध्ये सहभागी असल्याबद्दल अनेक वेळा अटक करण्यात आली आहे. कल्याणीविरुद्ध मुंबईतही फौजदारी खटला दाखल करण्यात आला होता. डिसेंबर २००५ मध्ये, पुण्याच्या बाहेरील एका हॉटेलमध्ये सेक्स वर्करच्या हत्येत कल्याणीचे नाव समोर आल्यानंतर पहिल्यांदाच तिच्याविरुद्ध मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणात पहिला एफआयआर हवेली पोलिस ठाण्यात दाखल झाला होता. यानंतर मकोका प्रकरणातून ती निर्दोष सुटली. ३१ मार्च २०१२ रोजी हिंजवडी पोलिसांनी कल्याणीला वेश्याव्यवसायाच्या एका प्रकरणात अटक केली. यानंतर अनकेदा तिला याप्रकरणात अटक झाली मात्र, ती नेहमीच जामिनावर सुटून बाहेर यायची आणि पोलिसांना चकवा देत वेश्याव्यवसाय चालवत राहिली. तब्बल २५ वर्ष ती पुण्याच्या ITकंपन्याना सेक्स वर्कर पुरवत होती. पुण्यात तिचे हाय प्रोफाईल सेक्स रॅकेट चालवले.

## स्थानिक गुन्हे शाखा सातारा व फलटण शहर पोलीस ठाणे यांची संयुक्त कारवाई

## फलटण येथे युवकाचा खून करून त्याचा गुप्तभाग कापुन चारीत पुरुन ठेवलेला खुनाचा गंभीर गुन्हा ३६ तासांच्या आत उघड करुन दोन आरोपींना अटक

**सातारा ( महेश उरुणकर):** सातारा जिल्ह्यातील फलटण येथे एका युवकाचा खून करून त्याचा गुप्तभाग कापुन चारीत पुरुन ठेवलेला खुनाचा गंभीर गुन्हा ३६ तासांच्या आत उघड करुन दोन आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.



नमुद घटनेबाबत मंगळवार दिनांक १०/०६/२०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजल्यापासून ते दिनांक ११/०६/२०२५, रोजीच्या सकाळी ११.३०. वाजण्याच्या दरम्यान मौजे ठाकुर की ता, फलटण, जिल्हा, सातारा, येथील पधंरकी नावाच्या शिवारात कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून इसम नाव संदीप मनोहर रिटे.रा.ठि.ठाकुरबुवा मंदिराच्या शेजारी ठाकुरकी तालुका, फलटण, जिल्हा सातारा यांच्या शरिरावर गंभीर मारहाण करून त्याचे गुप्तांग कापून त्याचा खुन केल्याबाबत फिर्यादीने तक्रार दिल्याने फलटण शहर पोलीस ठाणे येथे गुरक्र २१५/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३,कलम,१०३.(१) २३८ प्रमाणे दिनांक ११/०६/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची घटना अत्यंत गंभीर स्वरूपाची असल्याकारणाने मा श्री तुषार दोशी, पोलीस अधीक्षक सातारा व श्रीमती डॉ वैशाली कडुकर अप्पर पोलीस अधीक्षक सातारा,राजीव नवले, उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा, यांनी अरुण देवकर पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांना सदर गुन्हा उघड करण्याच्या सूचना दिल्या होत्या.त्याप्रमाणे श्री, अरुण देवकर, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांनी पोलीस उपनिरीक्षक श्री विश्वास शिंगाडे.व पोलीस अंमलदार अमोल माने.अजित कर्णे.जयवंत खांडके.स्वप्निल दौंड,वैभव सावंत.यांचे सर्वाचे पोलीस पथक तयार करून गुन्हा तात्काळ उघड करण्याच्या सूचना देवुन तपास कामी फलटण शहर पोलीस ठाण्यास पाठविण्यात आले होते.सदर पोलीस पथकाने फलटण येथे जावुन गुन्ह्याच्या घटनास्थळास भेट देवून तेथील सत्य परिस्थितीची माहिती घेवुन पोलीस निरीक्षक श्री.अरुण देवकर यांनी दिलेल्या सुचनेनुसार फलटण शहर पोलीस ठाण्याकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या समवेत तपास केला असता घटनास्थळावर मिळुन आलेला मृतदेह हा संदीप मनोहर रिटे,रा ठि, ठाकुरबुवा मंदिर शेजारी, ठाकुरकी.ता, फलटण जिल्हा सातारा यांचा असल्याची खात्रीलायक माहिती प्राप्त झाली. तसेच तो दिनांक १०/०६/२०२५ रोजी सकाळी कामावर गेला होता.तेव्हा पासून तो परत घरी आला नसल्याची माहिती मिळुन आली तपास पथकाने घटनास्थळावर हजर राहून सर्व प्रथम आजुबाजुचे साक्षीदार यांच्याकडे विचारपूस करुन माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला परंतु घडल्या प्रकाराबद्दल काही एक माहिती मिळुन येत नव्हती.सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने पोलीस तपास पथक सर्वोत्तपरी तपास करीत होते.

गुरुवार दिनांक १२/०६/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक श्री अरुण देवकर यांना त्यांचे विश्र्वासनीय गोपनीय बातमीदारा मार्फत बातमी प्राप्त झाली की फलटण शहरांमधील मच्छीमार्केट येथे दिनांक १०/०६/२०२५, रोजी सायंकाळी मयत संदीप रिटे.व अज्ञात इसमाचा मोबाईल घेतल्याच्या कारणांमुळे वाद निर्माण झाला होता.त्या अज्ञात इसमाने मयत संदीप रिटे,याचा मोबाईल काढून घेवुन तो तेथून निघून गेला होता.त्याच्या पाठोपाठ मयत संदीप रिटे हा देखील गेला असल्याची खात्रीलायक बातमी प्राप्त झाली.त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोउपनि विश्र्वास शिंगाडे.यांच्या पोलीस तपास पथकाने वेशांतर करून त्याच्या तपासाची दिशा ठरवुन तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदार यांचे विस्तारीत जाळे निर्माण करून त्या अज्ञात इसमाचा तातडीने शोध घेवुन त्यास तात्काळ ताब्यात घेतले. त्या इसमाकडे सदर गुन्ह्याबद्दल चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा त्याच्या चुलत भावाच्या सांगण्यावरून साडेपाच लाख रुपयांची सुपारी नक्की करुन संदीप रिटे याला जीवे मारल्यावर पैसे देण्याच्या अटीवर गुन्हा केला असल्याची कबुली दिली आहे.अशा प्रकारे स्थानिक गुन्हे शाखेकडील व फलटण शहर पोलीस ठाणे कडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर खुनाचा गंभीर गुन्हा दाखल झाल्यापासून २४ तासांच्या आत उघड केलेला आहे.

सदर कारवाई मध्ये मा श्री तुषार दोशी.पोलीस अधिक्षक, सातारा व श्रीमती डॉ वैशाली कडुकर अप्पर पोलीस अधीक्षक सातारा, श्री, राजीव नवले उपविभागीय पोलिस अधिकारी सातारा विभाग सातारा बाळासाहेब भालचीम, उपविभागीय पोलीस अधिकारी वाई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री अरुण देवकर पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, सातारा.हेमंतकुमार शहा.पोलीस निरीक्षक, फलटण.शहर पोलीस ठाणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन नम, नितीन शिंदे.रोहित फार्णे, पोलीस उपनिरीक्षक श्री विश्र्वास शिंगाडे.परितोष दातीर, गोपाल बदने, पोलीस अमंलदार मोहन नाचण, साबीर मुल्ला, मंगेश महाडिक, अमोल माने, अजित कर्णे, जयवंत खांडके.मुनिर मुल्ला.हसन तडवी,सनी आवटे,अजय जाधव.अमित झेंडे.अमृत कर्पे, पंकज बेसके, शिवाजी भिसे.प्रविण कांबळे. स्वप्निल दौंड.केतन शिंदे.रविराज वर्णेकर, प्रविण पवार, वैभव सावंत.दलजीत जगदाळे.फलटण शहर पोलीस स्टेशनचे पोलीस अमंलदार अनिल बारेला, बापुराव पायगुडे, राजेंद्र नाळे, नितीन सजगने, सचिन भोसले, चंद्रकांत धापते जितेंद्र टिके.काकासो,कर्णे, सचिन पाटोळे.गणेश अवघडे, निखील गायकवाड. अतुल बडे, महिला पोलीस अमंलदार राणी फाळके. फलटण ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस अमंलदार

**खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींची नावे,–**

**१) मंगेश ऊर्फ सोन्या सचिन मदने,वय २१ वर्षे.फलटण,जि, सातारा.**

**२) सोमनाथ माणीक मदने वय,३२ वर्षे, रा ठि, फलटण जिल्हा सातारा,**

## कोल्हापूर हादरलं..! नवविवाहित जोडपं बाथरूममध्ये मृतावस्थेत सापडलं,

### नेमकं काय घडलं?



**कोल्हापूर ( सिमा सकपाळ):** कोल्हापुरातुन धक्कादायक घटना समोर आली आहे. येथे एका नवविवाहित जोडप्याचा बाथरूममधील गॅस गिझरच्या गळतीमुळे गुदमरून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. आग्रा तालुक्यातील बुरुडे येथील भावेश्वरी कॉलनीत सदरची घटना घडली आहे. सागर सुरेश करमळकर (वय ३२ वर्ष) व त्यांची पत्नी सुषमा सागर करमळकर (वय २६ वर्ष) अशी मृतांची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सागर आणि सुषमा या दोघांचे लग्न २० मे रोजी झाले होते. रविवार (१५ जून) रोजी ते आंबोलीला फिरायला गेले होते. तेथून परतल्यानंतर सागरने कोणाचेही फोन उचलले नाहीत. काही वेळाने त्याचा फोन बंद झाल्यामुळे त्याच्या मित्रांना शंका आली.

१६ जून रोजी सकाळी सागरचे मित्र त्याच्या घरी भेटायला गेले. घरी आल्यानंतर त्यांनी दरवाजा बराचवेळ ठोठावला. मात्र आतून त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही. तेंव्हा दरवाजा थोडा उघडा दिसला. त्यानंतर मित्रांनी घरात प्रवेश केला. प्रवेश केला असता त्यांना गॅसचा वास आला. त्यानंतर ते बाथरूमच्या दिशेने गेले. तेंव्हा बाथरूममध्ये गॅस गिझरमधून गळती होत होती. तेथे सागर आणि सुषमा दोघेही बेशुद्ध अवस्थेत पडल्याचे त्यांना दसून आले. त्यानंतर मित्रांनी तातडीने पोलिसांना सदर घटनेची माहिती दिली.

सदर घटनेची माहिती पोलिसांना कळताच पोलीस तातडीने घटनास्थळी पोहचले. त्यांनी दोघांचेही मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवले. ''नेमका मृत्यू गॅस गळती झाल्याने गुदमरून झाला की अन्य कोणत्या कारणातून झाला, हे स्पष्ट होणे बाकी आहे,'' असे पोलिसांनी सांगितले.

# अवघ्या ३ तासात हरवलेल्या ७ वर्षीय बालकाचा शोध.. डहाणू पोलिसांची कामगिरी

**पालघर (शाहिद सय्यद):** पालघर जिल्ह्यातील डहाणू लोणी पाडा येथील हरवलेला ७ वर्षीय बालक आदर्श विनोदकुमार सिसोदिया याला डहाणू पोलिसांनी अवघ्या ३ तासात अथक प्रयत्न करून शोधून त्याला त्याच्या कुटुंबियांच्या स्वाधीन केले आहे.

डहाणू पोलीस ठाणे हद्दीतील लोणी पाडा येथील ७ वर्षीय बालक आदर्श सिसोदिया गुरुवार दिनांक १२ जून २०२५ रोजी हरवला होता. या बालकाचा शोध घेण्यासाठी डहाणू पोलिसांनी डहाणू पोलीस ठाण्याच्या हद्दीत व परिसरात वेगवेगळी शोध पोलीस पथके नेमून तसेच विविध सोशल मीडिया ग्रुप वर माहिती पाठवून शोध घेत असताना डहाणू पोलिसांना खात्रीशीर माहिती मिळाली की आदर्श विनोद कुमार



सिसोदिया हा विरार पोलीस ठाणे हद्दीत मिळून आल्याने तेथील पोलिसांनी सदर बालकास त्याच्या सुरक्षितेसाठी व पुढील शोध कामासाठी मा.अधीक्षक बालकल्याण समिती पालघर यांच्याकडे हजर केले आहे. व बालकास गिरी वनवासी प्रगती मंडळ मुला मुलींचे बालगृह नरेश वाडी धुंदलवाडी डहाणू येथे सुरक्षित साठी ठेवले आहे. अशी माहिती मिळताच डहाणू पोलिसांनी बालगृहाचे अधीक्षिका वळवी यांच्याशी संपर्क साधून या बालकाला ताब्यात घेऊन सदर बालकाला शुक्रवार दिनांक १३ जून रोजी सुखरूप पणे त्याच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन केले आहे.

सदर अपहरीत बालकाचा ३ तासात शोध लावण्यात डहाणू पोलिसांना यश आले आहे.सदर यशस्वी शोध मोहीम पालघर जिल्हा पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, श्रीमती अंकिता कणसे उपविभागीय पोलीस अधिकारी डहाणू यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. भागिरथी पवार,परि.पोलीस उप अधीक्षक प्रभारी डहाणू व पोलीस उप निरीक्षक पवार या टीमने पार पाडली आहे

अमली पदार्थ विरोधी पथक –२ गुन्हे शाखा – पुणे शहर यांची उल्लेखनीय कामगिरी

# १२,१२,३६०– रुपये किंमतीचे ५९,४०० ग्रॅम मॅफेड्रॉन ( एम.डी.) अंमली पदार्थ, फरासखाना पोलीस ठाणे हद्दीतुन केला जप्त

**पुणे (सच्चिदानंद राजू जाधव):** पुणे शहरातील फरासखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये शनिवार दिनांक १४/०६/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक–२ गुन्हे शाखा यांनी जोरदार कारवाई करुन १२,१२,३६०/–रु.किं,चे,५९,४०० ग्रॅम मॅफेड्रॉन (एम.डी.) अंमली पदार्थ फरासखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये जप्त करण्यात आला आहे.

नमुद घटनेबाबत शनिवार दिनांक १४/०६/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक २ गुन्हे शाखा पुणे शहर चे पोलीस निरीक्षक श्री सुदर्शन गायकवाड. सहा.पो नि, नितीनकुमार नाईक,मा, पोलीस उपनिरीक्षक अस्मिता लाड.व पोलीस पथक असे फरासखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलींग करीत असताना पोलीस अमंलदार सय्यद साहिल नजीर शेख यांना मिळालेल्या बातमीवरुन बुधवार पेठ,बाटा बोळ. लक्ष्मीरोड.पुणे येथे इसम शरणप्पा नागाप्पा कटिमणी वय,३४, वर्षे, रा ठि,आप्पा दुगड शाळेजवळ,कात्रज पुणे,मुळ रा ठि मु.पो. भापंर गल्ली.जि.गुलबर्गा,राज्य, कर्नाटक, यांच्या ताब्यात एकुण १२,१२,३६०/–रु किंमतीचा मॅफेड्रॉन ( एम डी) हा अंमली पदार्थ तसेच रोख रक्कम व इतर ऐवज जप्त करुन त्याच्या विरुद्ध फरासखाना पोलीस ठाणे येथे गुरक्र ११८/२०२५,एन डी पी एस अधिनियम कलम ८.(क).२१(क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा पोलीस आयुक्त पुणे शहर श्री, अमितेशकुमार,मा पोलीस सह आयुक्त पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा.मा.अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे, पुणे शहर श्री, पंकज देशमुख,मा, पोलीस उप आयुक्त गुन्हे पुणे शहर श्री निखिल पिंगळे. मा.सहा.पोलीस आयुक्त.गुन्हे–२ श्री, राजेंद्र मुळीक, यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक–२.गुन्हे शाखा पुणे, शहर कडील पोलीस निरीक्षक श्री सुदर्शन गायकवाड.सहा, पोलीस निरीक्षक, नितीशकुमार नाईक.मपोउपनि. अस्मिता लाड.व पोलीस अमंलदार चेतन गायकवाड.मयुर सुर्यवंशी. साहिल शेख. उदय राक्षे, संदिप शेळके.अझिम शेख.योगेश मांढरे.युवराज कांबळे.आझाद पाटील.निलम पाटील.दिशा खेवलकर रविंद्र रोकडे.यांनी केली आहे.

# मुंबईत ४३ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

## मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेल्या ३७ पोलीस निरीक्षकांना वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी बढती देऊन त्यांचीही बदली करण्यात आली आहे.

**मुंबई ( उमेश मनोहर शेट्ये):** मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेल्या ४३ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या तर ३७ पोलीस निरीक्षकांना वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी बढती देऊन त्यांचीही बदली करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून काही अधिकारी बढतीच्या प्रतीक्षेत होते. अखेर या बदल्यांचे आदेश शनिवारी जारी करण्यात आले.

दरम्यान बदली झालेल्या जागी संबंधित पोलीस अधिकार्ध्यांनी तातडीने रुजू होण्याचे आदेश पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी दिले आहेत. मुंबईतील ४३ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या असून त्यात अविनाश एकनाथ काळदाते (घाटकोपर पोलीस ठाणे–नवी मुंबई), रणजीत सूर्यकांत आंधळे (सांताक्रुज पोलीस ठाणे–मिरा–भाईंदर–वसई–विरार), मधुकर रामनाथ सानप (अकोला–विमानतळ पोलीस ठाणे), इरफान इब्राहिम शेख (ठाणे–गुन्हे शाखा), गबाजी शंकर चिमटे (चंद्रपूर–विलेपार्ले पोलीस ठाणे), गणेश बाळासाहेब पवार (ठाणे–एमएचबी पोलीस ठाणे), सदानंद कल्लप्पा माने (अकोला–संरक्षण व सुरक्षा), राजेंद्र श्रीधर काणे (रत्नागिरी–विशेष शाखा एक), उमेश सोपान मचिंदर (लातूर–अंधेरी पोलीस ठाणे), बळवंत व्यकंट देशमुख (ठाणे–घाटकोपर पोलीस ठाणे), जयश्री जितेंद्र गजभिये (नागरी हक्क संरक्षण–वाहतूक)

राजेश रामचंद्र शिंदे (लोहमार्ग–ट्रॉम्बे पोलीस ठाणे), महेश भगवान बळवंतराव (एमएचबी पोलीस ठाणे–संरक्षण व सुरक्षा), उदयसिंग भगवान सिंगाडे (मलबार हिल पोलीस ठाणे–विशेष शाखा एक), रमेश पंढरीनाथ भामे (अंधेरी पोलीस ठाणे–जोगेश्वरी पोलीस ठाणे), अजय पांडुरंग कांबळे (नागपाडा पोलीस ठाणे–विशेष शाखा एक), देवराज हरसिंग बोरसे (जोगेश्वरी पोलीस ठाणे–सशस्त्र पोलीस दल), सचिन गंगाराम गावडे (ताडदेव पोलीस ठाणे–संरक्षण व सुरक्षा), गजानन रमेश विखे (गोराई पोलीस ठाणे–संरक्षण व सुरक्षा), संदीप बाबाजी विश्वासराव (कफ परेड पोलीस ठाणे–गोरेगाव पोलीस ठाणे), सुधाकर परबाती धाने (अॅण्टॉप हिल पोलीस ठाणे–विशेष शाखा एक), ज्योती घनश्याम भोपळे–बागुल (चारकोप पोलीस ठाणे– वाहतूक), जनार्दन सुभाष परबकर (कुरार पोलीस ठाणे–विशेष शाखा एक)

अनिल आत्माराम पाटील (समतानगर पोलीस ठाणे–सशस्त्र पोलीस मरोळ), वैभव कांतीलाल शिंगारे (सांताक्रुज पोलीस ठाणे–मुख्य नियंत्रण कक्ष), कविदास सुरेश जांभळे (खैरवाडी पोलीस ठाणे–गुन्हे शाखा), राजीव यादवराव शेजवळ (वडाळा पोलीस ठाणे–विशेष शाखा एक), मोहन गणपती पाटील (ओशिवरा पोलीस ठाणे–संरक्षण व सुरक्षा), सदाशिव विष्णू निकम (आंबोली पोलीस ठाणे–आर्थिक गुन्हे शाखा), गंगाराम जेत्या वाळवी (ट्रॉम्बे पोलीस ठाणे–सशस्त्र पोलीस नायगाव), राजेश रामकृष्ण गाठे (आरसीएफ पोलीस ठाणे–दक्षिण नियंत्रण कक्ष ), दत्तात्रय रघुनाथ खंडागळे (भांडुप पोलीस ठाणे–वाहतूक), सुदर्शन रघुनाथराव होनवडकर (विशेष शाखा एक–वडाळा पोलीस ठाणे), सतीश दत्तात्रय गायकवाड (संरक्षण व सुरक्षा–कफ परेड पोलीस ठाणे), अंजेलिना मोजेस लोबो (सशस्त्र पोलीस मरोळ–नवघर पोलीस ठाणे), प्रमोद बळीराम तावडे (वाहतूक–साकिनाका पोलीस ठाणे), संजीव बळीराम तावडे (वाहतूक–कुरार पोलीस ठाणे), जयवंत शाम शिंदे (आर्थिक गुन्हे शाखा–समतानगर पोलीस ठाणे), विनायक उत्तमराव चव्हाण (गुन्हे शाखा–चारकोप पोलीस ठाणे), सुप्रिया उदय मालशेट्टी (विशेष शाखा एक–खेरवाडी पोलीस ठाणे), रहिमतुल्ला इनायत सय्यद (सशस्त्र पोलीस नायगाव–शाहूनगर पोलीस ठाणे), महेश धनंजय निवतकर (गुन्हे शाखा–गोराई पोलीस ठाणे), प्रतिभा उमेश मुळे (विशेष शाखा एक–यलोगेट पोलीस ठाणे)

दुसरीकडे वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या बदल्यानंतर शनिवारी ३७ पोलीस निरीक्षकांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून बढती देण्यात आली आहे. या बढतीनंतर त्यांच्याही बदल्यांचे




आदेश जारी करण्यात आले आहेत. या पोलीस अधिकार्ध्यांमध्ये बाळासाहेब राघोजी पवार (चेंबूर पोलीस ठाणे–भांडुप पोलीस ठाणे), सुरेश पांडुरंग मदने (नवघर पोलीस ठाणे–सशस्त्र पोलीस नायगाव), रमेश सदाशिव ढसाळ (वाहतूक–वाहतूक), अनिल भाऊराव पाटील (चारकोप पोलीस ठाणे–संरक्षण व सुरक्षा), शर्मिला शशिकांत सहस्त्रबुद्धे (गुन्हे शाखा–गुन्हे शाखा), अनिल प्रतापराव पाटील (मलबार हिल पोलीस ठाणे–मलबार हिल पोलीस ठाणे), प्रितम शाम बाणावली (मालवणी पोलीस ठाणे–ओशिवरा पोलीस ठाणे),नंदराज दिनकर पाटील (खार पोलीस ठाणे–गुन्हे शाखा), निलिमा सचिन कुलकर्णी (आझाद मैदान पोलीस ठाणे–ताडदेव पोलीस ठाणे)

शैलेश लक्ष्मीनारायण अंचलवार (व्ही. पी रोड पोलीस ठाणे–सशस्त्र पोलीस ताडदेव), सुनिल दत्तात्रय कदम (कांजूरमार्ग पोलीस ठाणे–आर्थिक गुन्हे शाखा), प्रभा सखाराम राऊळ (संरक्षण व सुरक्षा–वाहतूक), अपर्णा अनंत जोशी (गुन्हे शाखा–गुन्हे शाखा), संजय पंडित पाटील (सांताक्रुज पोलीस ठाणे–माहीम पोलीस ठाणे), गिरीधर सीताराम गोरे (भोईवाडा पोलीस ठाणे–सशस्त्र पोलीस नायगाव), आशा विश्वनाथ कोरके (सशस्त्र पोलीस मरोळ–सशस्त्र पोलीस मरोळ), मधुलिका प्रमोद साळुंखे–पाटील (बीकेसी पोलीस ठाणे–वरळी पोलीस ठाणे), महादेव शिवाजी कुंभार (जुहू पोलीस ठाणे–आरसीएफ पोलीस ठाणे), केशवकुमार मारोती कासार (विक्रोळी पोलीस ठाणे–अॅण्टॉप हिल),

योगेश रामचंद्र शिंदे (पवई पोलीस ठाणे–सांताक्रुज पोलीस ठाणे), अमोल पांडुरंग टमके (ताडदेव पोलीस ठाणे–संरक्षण व सुरक्षा), सुवर्णा रमेश शिंदे (गुन्हे शाखा–गुन्हे शाखा), माधुरी रामचंद्र पाटील (दादर पोलीस ठाणे–संरक्षण व सुरक्षा), लता दत्तात्रय सुतार (गुन्हे शाखा–गुन्हे शाखा), प्रमोद श्रीराम कोकाटे (मुलुंड पोलीस ठाणे–आंबोली पोलीस ठाणे), सिमाराम लक्ष्मण डुबल (समतानगर पोलीस ठाणे–आर्थिक गुन्हे शाखा), अंजुम काशिम बागवान (आरसीएफ पोलीस ठाणे–संरक्षण व सुरक्षा), सुहास जनार्दन चौधरी (वाहतूक–वाहतूक), अनघा अशोक सातवसे (नेहरुनगर पोलीस ठाणे–शिवाजीनगर पोलीस ठाणे), सुवर्णा विजय आडसुळ (गुन्हे शाखा–), प्रसाद जगदीश साटम (विशेष शाखा एक–विशेष शाखा दोन), प्रदीप शिवाजी काळे (बोरिवली पोलीस ठाणे–नागपाडा पोलीस ठाणे), ऋता शशांक नेमलेकर (गोवंडी पोलीस ठाणे–आर्थिक गुन्हे शाखा), सीमा भगवानदास गुप्ता (विशेष शाखा एक–सशस्त्र पोलीस वरळी), मनिषा केशव पाटील (आर्थिक गुन्हे शाखा–विशेष शाखा दोन), देवेंद्र रामचंद्र पोळ (व्ही. बी नगर पोलीस ठाणे–सहार पोलीस ठाणे)

# आले किती गेले किती संपले सगळे भरारा शिवसेनेचा (उबाठा) कायमच राहील दरारा





उत्तर रत्नागिरी जिल्हा प्रमुख श्री.बाळा खेडेकर यांचे स्वागत करताना समाज भूषण आपला माणुस गणेशभाऊ खेडेकर जनसेवक

उत्तर रत्नागिरी जिल्हा प्रमुख पदी बाळा खेडेकर यांची नियुक्ती शिव सेना भवन येथे आशिर्वाद बैठक आयोजित झाली उत्तर रत्नागिरी जिल्हा प्रमुख पदी बाळा खेडेकर यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांनी शिव सेना भवन मुंबई येथे ज्येष्ठ शिव सैनिकांचे आशीर्वाद बैठकीचे आयोजन केले होते या आशीर्वाद बैठकीला विश्वासू कट्टर निस्वार्थी प्रामाणिक आणि ज्येष्ठ शिव सैनिक यांच्यासह अनेक शिव सैनिक उपस्थित राहिले होते जेष्ठ शिव सैनिक यांनी आशिर्वादसह मोलाचे मार्गदर्शन केले बाळा खेडेकर यांनी जिल्ह्यातच नाही तर अखंड कोकणात शिव सेनेच्या माध्यमातून जनतेची कामे केली आहेत ते करताना शिवसेना संघटीत करण्याचे काम ते करीत आहेत.

कोकणात शिव सेनेला उभारी करण्याचे कार्य बाळा खेडेकर कसोटीने करत आहेत अत्यंत प्रामाणिक कोणत्याही अमिषाला बळी न पडता हिमालया सारखे कंबर कसून शिव सेनेची बांधणी अगदी प्रभावीपणे कोकणात करीत आहेत कोकणातून गद्दारांना हद्दपार केल्याशिवाय स्वस्त बसनार नाही अशी प्रतिज्ञा केली आहे कोकणात शिव सेनेचा भगवा झेंडा डोलाने फडकावणारच आणि घरों घरी शिव सेना पोचवणार गाव तिथे शाखा आणि घर तिथे गट प्रमुख ही योजना राबवणार आहे हे पद आणि जबाबदारी फक्त माझे नसून माझ्या सर्व शिव सैनिकांची आहे असे मी मानतो. माननिय बाळासाहेबांनी सांगितले आहे राहिले ते मावळे आणि उडाले ते कावळे. जो पर्यंत माझा शिव सैनिक आहे तो पर्यंत शिव सेनेला कोणीच संपवू शकत नाही कारण शिवसेना ही बाप आहे शिव सैनिकच जन्माला घालते.आले किती गेले किती संपले सगळे भरारा, परंतु शिव सेनेचाच राहिल कायम दरारा. अशी चौफेर फटकेबाजी करत बाळा खेडेकर यांनी उपस्थित शिव सैनिकांत स्फूर्ती निर्माण केली चेतना निर्माण केली तर जेष्ठ शिव सैनिकांनी खरोखरच शिव सेना म्हणजे त्यात आहे,निष्ठा आहे,निर्भीडता आहे,निस्वार्थ आहे.असे अनेक अनुभव सांगून बाळा खेडेकर यांना भरभरुन भरपूर आशीर्वाद दिले.तर अनेक उपस्थितांनी बाळा खेडेकर यांना शाल आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि अनेकांचे आशीर्वाद घेऊन बैठकीचे समारोप केले.

# वाघोली पोलीस स्टेशनच्या पोलीस पथकाची दमदार कारवाई

## पुणे शहराच्या वाघोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत अपहरण करून खंडणी मागणाऱ्या चार सराईत आरोपींचा पोलीसांनी केला पर्दाफाश

**पुणे (अतुल खंडेलवाल):** पुणे शहरातील वाघोली पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये रविवार दिनांक १५/०६/२०२५, फिर्यादी यांचे चुलत भाऊ यांनी पोलीस स्टेशन येथे येवुन खास खबर दिली की माझा चुलत भाऊ यांचे कोणीतरी अपहरण करून त्यांच्या मोबाईलवरुन व्हॉटसाप कॉलद्वारे १५ लाख रुपये द्या आणि त्यांना घेवुन जा,अशी गंभीर धमकी दिली आहे. सदर खबरीचे गांभीर्य ओळखून मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथक पोलीस अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्री ,मनोज बागल.पोलीस अंमलदार प्रदिप मोटे, पांडुरंग माने,दिपक कोकरे,विशाल गायकवाड व साई रोकडे.यांचे पोलीस पथक टिम तयार केली.सदर पोलीस पथकाने खबर देणाऱ्या इसमाबरोबर डम्मी पैशाची बॅग तयार करून आरोपीने दिलेल्या माहितीनुसार सांगितलेल्या ठिकाणी देहु रोड परिसरात जावुन पोलीस अंमलदार चालक एक डम्मी ड्रायव्हर म्हणून डमी चार चाकी गाडीमध्ये खबर देणाऱ्या इसमाबरोबर डम्मी पैशाच्या बॅगसह सदर ठिकाणी गाडी उभी केली व बाकी इतर पोलीस स्टाफ सदर ठिकाणी गुप्त सापळा रचून थांबलेले असताना दोन अनोळखी इसम दुचाकीवरून आले व डम्मी चार चाकी गाडीजवळ येवुन खबर देणाऱ्या इसमाशी बोलत असताना डमी पैशाची बॅग घेण्याचा प्रयत्न करताना त्यास चालक पोलीस अंमलदार त्यांनी पकडण्यासाठी गेले असताना त्यांनी दुचाकीवरून पळुन जाण्याचा प्रयत्न केला. परंतु पोलिसांनी त्यांना पाठलाग करुन मोठ्या शिताफीने पकडून ताब्यात घेवुन नाव विचारले असता त्यांनी त्यांची नावे १) गौरव राजु कांबळे.२) ऋृश्रीकेष किशोर शिंदे.अशी असुन त्यांच्याकडे सखोलपणे चौकशी केली असता त्यांनी सांगितले की ३) इरफान खान.४) अतहर सोहेल अनवर हे यात सामील असुन अपहरण व्यक्ती ही




त्यांच्या दोन साथीदारांच्या ताब्यात असुन त्यांनी आम्हास रक्कम स्विकारण्याकामी पाठविले.असल्याचे सांगितले.त्यावेळी गौरव कांबळे.याच्या मोबाईलवरून अपहृत ताब्यात असलेल्या इसमांना फोन करून पैसे मिळाले असल्याचे बनावट कळविण्यात आले असता त्यांनी अपहृत व्यक्तीस कासारवाडी मेट्रो स्टेशनच्या बाहेर सोडले. त्यावेळी अपहृत व्यक्ती सुखरूप मिळाली.

त्यानंतर अपहृत व्यक्ती यांनी पोलीस स्टेशन येथे येवुन फिर्याद दिली की दिनांक १४/०६/२०२५, रोजी रात्री २२:३०, वाजता ते दिनांक १६/०६/२०२५, रोजी रात्री ०१.३० वाजण्याच्या सुमारास चार इसमांनी मला माझ्या रुम वरुन त्यांच्या स्कॉर्पीओ गाडीमध्ये पिंपरी चिंचवड भागात रुमवर घेवुन जावुन अक्षय व आर्यन यास का सोडून दिले.अक्षय यांने घेतलेल्या २५ लाखांपैकी १५ लाख रुपये दे असे म्हणुन मला डांबुन ठेवुन मारहाण करून मारण्याची धमकी दिली.तसेच २५ लाख रुपयांची खंडणीची मागणी करुनघ

माझा चुलत भाऊ यांच्याकडून १० लाख रुपये स्विकारण्याचा प्रयत्न केला म्हणून यातील ६ इसमांविरुद्ध कायदेशीर फिर्याद दिल्यावरुन वाघोली पोलीस स्टेशनयेथे गुरक्र,२७४६२०२५,भा न्या सं कलम ३०८,३३३,१४०,(२) १२७.(२) १८९ (१)(२) १९० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे .सदर गुन्ह्यातील आरोपी गौरव राजीव कांबळे,वय,२९ वर्षे रा ठि,साईबाबानगर, गणपती मंदिरा जवळ, चिंचवड रेल्वे स्टेशन पुणे,२) ऋृश्रीकेष किशोर शिंदे. वय,२४, वर्षे,रा ठि,दुर्गानगर,निगडी, तळवडे रोड.प्लट क्र,८०५,निगडी पुणे,३) मोहम्मद इस्फान खान,गुलफाम खान, वय ३३ वर्षे,रोड न,१०,लेनन,०१ ,गंवडी,बैगनवाडी, नवीमुंबई,४) मोहम्मद अतहर सोहेल मोहम्मद अनवर वय,२८ वर्षे.जकारीया इस्टेट,अल इब्राहम मुंबई यांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा यशस्वी तपास मा अप्पर पोलीस आयुक्त ( पुर्व प्रादेशिक विभाग,) पुणे शहर श्री,मनोज पाटील.मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ –४ पुणे शहर श्री हिम्मत जाधव. सहाय्यक पोलीस आयुक्त.येरवडा विभाग पुणे शहर.श्रीमती, प्रांजली सोनावणे.यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक. वाघोली पोलीस स्टेशन.श्री युवराज हांडे, तपास पथक पोलीस अधिकारी. पोलीस उपनिरीक्षक मनोज बागल.पोलीस अमंलदार बाबासाहेब मोराळे.रामचंद्र पवार, प्रदिप मोटे.शिवाजी चव्हाण.समीर मोरडे. दिपक कोकरे, साईनाथ रोकडे.पांडुरंग माने, विशाल गायकवाड.मंगेश जाधव, राजाराम अस्वले, शिवाजी सालके,प्रितम वाघ.नामदेव गडदडे यांनी केली आहे.

‘पोलीस तपास ’ साप्ताहिक प्रकाशक, मुद्रक मालक श्री. राजु गणपत जाधव यांनी जागृती प्रिंटिंग प्रेस, अे/१२ तळमजला, भायखळा सर्विस इंडस्ट्रिज, दादोजी कोंडदेव क्रॉस रोड, भायखळा (पू), मुंबई- ४०० ०२७ (महाराष्ट्र राज्य) येथे छापून ज्योतीर्लींग को-ऑप.हौ. सोसायटी, आर/१,बी-३२,३रा मजला, आजगांवकर,प्लॉट, अस्मिता शाळेजवळ, बांद्रेकर वाडी, जोगेश्वरी (पू.) मुंबई- ४०००६० येथुन प्रकाशित केले. ( सर्व वाद मुंबई न्यायालयीन कक्षेत.)
संपादक - श्री. राजु गणपत जाधव. मोबा.:९९६९३२७०८७, ९७६९०३४९९८ RNI No. : MAHMAR / 2013 / 51541 email :- policetapas63@gmail.com website :- www.policetapas.com